**महाराष्ट्र विधानसभा**
**तिसरे अधिवेशन, २०२४**
---------------------------
**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ११ जुलै, २०२४ / आषाढ २०, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री | |
| (३) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (४) | कामगार मंत्री | |
| (५) | उद्योग मंत्री | |
| (६) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (७) | महिला व बालविकास मंत्री | |
| (८) | क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री | |
| (९) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | |

-------------------------------------
**प्रश्नांची एकूण संख्या - २४**
-------------------------------------

**माणगांव (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेबाबत**

**(१) * ८३८६९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर):** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगांव (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील जिल्हा प्रमुख मार्ग क्र.२७ (आकेरी - दुकानवाड) ते कुबल बेंगुर्लेकर यांचे घर (मळावाडी) या ग्रामपंचायत मालकीच्या सार्वजनिक रस्त्यावर काही लोकांनी अतिक्रमण केल्याचे माहे एप्रिल व मे, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर व्यक्तींनी माणगांव येथील सर्व्हे क्र.६३/४ या शेतजमीनींवर आणि सर्व्हे क्र.६३/१ या प्लॉटच्या ना बांधकाम क्षेत्रामध्ये (Non construction zone) कोणतीही परवानगी न घेता हॉलचे व इतर अनधिकृत बांधकाम केलेले असून त्याचा वापर व्यावसायिक उद्देशासाठी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर व्यक्ती ही गुंड प्रवृत्तीची असून त्यांच्यावर पोलिस स्टेशनमध्ये विविध स्वरुपाचे अनेक गुन्हे दाखल असून ते परिसरात दहशत निर्माण करीत असल्याबाबतचे निवेदन जिल्हा पोलिस अधिक्षक व पोलिस निरिक्षक, कुडाळ यांच्याकडे दिनांक १८ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास स्थानिक नागरिकांनी देऊनही संबंधित व्यक्तीवर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गावातील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पालकमंत्री, सिंधुदुर्ग यांच्याकडे तक्रार करून देखील अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही,

खाजगी रित्या स्वखर्चाने सदर रस्त्यावर १२ फूट रुंद व ७० फूट लांब पेव्हिंग ब्लॉक बसविले आहेत. मात्र सदर रस्त्यावर गाडयांची वाहतूक व ग्रामस्थांची ये-जा सुरू आहे.
(२) हे खरे आहे,
(३) गैरअर्जदार श्री. आत्माराम मनोहर नार्वेकर, रा. माणगांव यांचेवर दारूबंदी अधि.क.६५(ई) अंतर्गत ५ गुन्हे दाखल आहेत. तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता कुडाळ पोलीस ठाणे चॅप्टर केस क्र. ९९/२०२४ Cr.pc कलम १०७ प्रमाणे दि. २७.०६.२०२४ रोजी प्रतिबंधक कारवाई प्रस्ताव तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, कुडाळ यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.
(४) हे खरे नाही,
(५) श्री.आत्माराम मनोहर नार्वेकर, रा. माणगाव यांनी खरेदी केलेल्या स्वमालकीच्या जमीन सर्वे नं.६३/४ या जमिनीवर अकृषिक परवाना न घेता मंगल कार्यालय बांधले आहे. त्याबाबत दंडात्मक कारवाई करून नियमित करण्यासाठीचा प्रस्ताव नगररचना कार्यालय, सिंधुदुर्ग यांचेकडे दि. १४/०६/२०२४ रोजी पाठविला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षयरोग निर्मूलनाकरीता करावयाच्या उपाययोजना

**(२) * ८००६७ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जवळजवळ २.५ लाख क्षयरोग रुग्ण असून त्यासाठी लागणाऱ्या औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय स्तरावर औषध खरेदीला झालेल्या विलंबामुळे राज्य शासनाला स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात या औषधांचे उत्पादन करावयाचे झाल्यास औषध उत्पादक कंपनीला ३ एफडीसीए या संयुक्तक औषधाची निर्मिती करून त्याच्या वितरणासाठी जवळपास तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, क्षयरोग रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या औषधांचा तुटवडा झाल्यास नियमित औषधांअभावी रुग्णांमध्ये क्षयरोग अधिक तीव्र होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ औषध पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२३ च्या उपलब्ध माहितीनुसार राज्यात सुमारे २.२७ लक्ष क्षयरोग रुग्ण आणि माहे जून, २०२४ अखेरीस १.१० लक्ष क्षयरोग रुग्ण आढळून आले आहेत. ३ FDC A या औषधांचा माहे एप्रिल, २०२३ मध्ये तुटवडा निर्माण झाला होता.तथापि सदर तुटवडा भरुन काढण्यासाठी स्थानिक स्तरावर औषध खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच त्यासाठी रु.१.६३ कोटी एवढा निधी जिल्हास्तरावर वितरीत करण्यात आला तसेच आवश्यकते प्रमाणे ३ FDC A औषधांच्या सुट्टया स्वरुपातील गोळया रुग्णांना देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.

केंद्रीय क्षयरोग विभागाकडील दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ पत्रानुसार राज्य शासनाला स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या होत्या.
(३) केंद्रीय क्षयरोग विभागाकडून या औषधांचा पुरवठा करण्यात येत आहे, माहे मे, २०२४ पासून पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(४) क्षयरोग विरोधी ३ FDC A या औषधाचा केंद्रीय स्तरावरून तुटवडा निर्माण झाला होता मात्र स्थानिक स्तरावरून केलेल्या विविध उपाययोजनांमुळे प्रत्यक्ष रुग्णांना औषधोपचार खंड न पडल्याने क्षयरोग अधिक तीव्र होण्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(५) क्षयरोग रुग्णांना आवश्यक असलेल्या औषधापैकी ३ FDC A या औषधाचा तुटवडा केंद्रीय स्तरावर निर्माण झाला होता व उर्वरित ४ FDC A, ३ FDC P, २ FDC P इ. औषधांचा सुरळीत पुरवठा होता. राज्य शासनामार्फत क्षयरूग्णाला लागणा-या ३ FDC A औषधांचा पुरवठा नियमित करण्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे:-
१. माहे मार्च, २०२४ मध्ये प्रत्येक जिल्ह्यांना ३ FDC A औषधांची तात्काळ खरेदी करता यावी यासाठी एकूण अनुदान रु १.६३ कोटी राज्यातील सर्व जिल्हा स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.
२. ३ FDC A च्या औषधांची खरेदी करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत रु ४.९५ कोटी रुपयांची तरतूद करून २ महिने पुरेल इतक्या औषधांची खरेदी प्रक्रिया महाराष्ट्र खरेदी प्राधिकरणाकडून राबविण्यात आलेली असून औषध पुरवठा सुरू झालेला आहे.
३. ३ FDC A या औषधा ऐवजी ३ FDC A मधील उपलब्ध औषधाचे घटक सुट्टे स्वरुपात राज्यात मुबलक प्रमाणात माहे मार्च अखेर उपलब्ध असल्याने तात्पुरत्या स्वरुपात Tab Rifampicin ३०० mg (उपलब्ध गोळया-१८६८०७),Tab Rifampicin ४५० mg (उपलब्ध गोळया-१२८२५४ ),Tab Ethambutol ८०० mg (उपलब्ध गोळया-१४७५९८) Tab Isoniazid १००mg (३३९१०१६),Tab Isoniazid ३०० mg (उपलब्ध गोळया-१०७७२५९६) यांचा आवश्यकते प्रमाणे वापर माहे एप्रिल,२०२४ मध्ये करण्यात आला आहे.

४. याच प्रमाणे सन २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत सर्व जिल्ह्यांकरिता एकूण १.६३ कोटी रुपयांच्या निधींची जिल्हास्तरावर तरतूद करण्यात आलेली आहे. पुढील कालावधीत तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी सर्व जिल्ह्यांना स्थानिक स्तरावर खरेदीची परवानगी दिलेली आहे.
५. भविष्यात क्षयरुग्णांना औषधाचा तुटवडा होवू नये म्हणून सन २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत रु. १३ कोटींची औषधे खरेदी करिता तरतूद करण्यात आली असून स्टेट बजेट मध्ये औषधे व साधनसामुग्री करिता रु.११ कोटी ४६ लाख ८५ हजार अशा अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हयातील अंगणवाडयांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३) * ८३६५२ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील ५३७५ अंगणवाडयांपैकी १३७५ अंगणवाडयांना इमारती नसून ११५ ठिकाणी स्वच्छतागृहे नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे बालके, महिला व अंगणवाडी ताई यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडयांना सर्व सोयी-सुविधा युक्त इमारती उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२), (३) व (४) अहमदनगर जिल्हयातील ५३७५ अंगणवाडयांपैकी ४०६५ अंगणवाडी केंद्रांना स्वतःची इमारत असून १३१० अंगणवाडयांना स्वत:ची इमारत नाही, त्यापैकी प्राथमिक शाळेत २८७, भाडोत्री/ खाजगी जागेत ८५८ अंगणवाडी केंद्र भरतात त्याठिकाणी शौचालय सुविधा उपलब्ध आहे. तर समाजमंदिरात १६५ अंगणवाडी केंद्र भरतात त्या ठिकाणी शौचालय उपलब्ध नसल्यामुळे पर्यायी व्यवस्था उपलब्ध केलेली आहे.

१५ वा वित्त आयोग जिल्हा परिषद विकास आराखडयामध्ये ९८ अंगणवाडी बांधकामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून अंगणवाडी बांधकामाकरिता प्राप्त निधी मधून सन २०२२-२३ मध्ये ११८ अंगणवाडी केंद्रांना व सन २०२३-२४ मध्ये ३६ अंगणवाडी केंद्रांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. सन २०२२-२३ मधील ११८ कामांपैकी ११० कामे पूर्ण झाली असून ८ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, सन २०२३-२४ मधील ३६ अंगणवाडी बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधेकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत अहमदनगर जिल्ह्याकरिता रुपये २.१६ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. नादुरुस्त शौचालयांची दुरुस्ती १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महिला व बाल कल्याण १० टक्के निधी, तसेच जिल्हा नियोजन समितीकडील महिला व बाल विकास करिता राखीव ३ टक्के निधीमधून दुरुस्तीची कामे प्रस्तावित आहेत.

-----------------

**रामराज (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरातील उमटे धरणातून गाळ काढणेसह नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करणेबाबत**

**(४) * ८१५६७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामराज (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरातील उमटे धरणातील गाळ काढण्याचे काम गेल्या दीड वर्षापासून बंद असल्याने उक्त धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या ४७ गावे व ३३ वाडयांमधील नागरिकांना शुद्ध पाण्याच्या प्रतिक्षेत रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमटे धरणाच्या पाण्यावर ४७ गावे व ३३ वाडया अवलंबून असून ग्रामस्थांना स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे म्हणून धरणातील गाळ काढण्यासाठी २१५ कोटी रूपये निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर धरणातील गाळ काढणे, नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

उमटे धरणावर अवलंबून ४७ गावे व ३३ वाडयांकरीता उमटे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना टप्पा-१ व टप्पा-२ अशी एकूण रु.२१५.३८ कोटी रकमेची अंदाजपत्रके तयार करण्यात आली होती. त्यापैकी टप्पा-१ योजनेस (अंदाजपत्रकीय रक्कम रु.७३.७९ कोटी) दिनांक २८.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. टप्पा-२ मध्ये समाविष्ट कामास जल जीवन मिशन अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेली नाही.

(३) उमटे धरणाचे काम सन १९७८ मध्ये मंजूर झालेले असून, सन २००९ पासून सदर धरण वापरण्याकरिता जिल्हा परिषदकडे हस्तांतरीत केले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून जिल्हा जलसंधारण विभागास धरणाचे बळकटीकरण व दुरुस्ती करुन गाळ काढण्यास दिनांक १५.०३.२०२४ अन्वये परवानगी दिली आहे. यासाठी जिल्हा परिषद, रायगड मार्फत निधीची मागणी करण्यात आली नाही.

जल जीवन मिशन अंतर्गत उमटे धरणावरुन उमटे टप्पा-१ (ता. अलिबाग, जि.रायगड) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रु. ७३७९.६८ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक २८.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली. सदर योजनेमध्ये धरणातील गाळ काढणे व सांडवा दुरुस्ती करणे या बाबी समाविष्ट नव्हत्या. सदर बाबींचा समावेश करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उमटे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा (टप्पा-१) रु. ८०७२.४१ लक्ष इतक्या किंमतीचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक १८.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदरील प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## थॅलेसेमियाग्रस्त मुलांना मोफत रक्त पुरवठा करणेबाबत

**(५) * ८१६७३ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील सर्व रक्तपेढयांना थॅलेसेमियाग्रस्त मुलांना मोफत रक्तपुरवठा करणे बंधनकारक असताना राज्यात अनेक रक्तपेढया अशा मुलांना मोफत रक्त पुरवठा करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने याबाबत केंद्र सरकार आणि देशातील सर्व राज्यांमधील आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाला पत्र पाठवून थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना मोफत रक्त पुरवठा न करणाऱ्या रक्त पतपेढीवर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक रक्तपेढया थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना शुल्क आकारत असल्याचे तसेच वेळेवर रक्त व रक्त घटकांचा पुरवठा करीत नसल्याच्या तक्रारी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करणेसंदर्भात तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) सद्य:स्थितीत राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे अशी तक्रार प्राप्त नाही.

(२) हे खरे आहे.

राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्र दिनांक ०८.०२.२०२४ अन्वये सर्व शासकीय / खाजगी रक्तकेंद्रांना थॅलेसिमिया आजारग्रस्त रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करणे बंधनकारक आहे असे कळविले आहे. सदर अर्धशासकीय पत्र राज्य रक्त संक्रमण परिषदेने राज्यातील सर्व परवानाधारक रक्तकेंद्रांना दिनांक १५.०२.२०२४ अन्वये कळविले आहे.

(३) राज्य रक्त संक्रमण परिषदेकडे विशिष्ट तक्रार प्राप्त झालेली नाही किंवा राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने अग्रेषित केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय आयुर्वेद, दंत आणि होमिओपॅथिक महाविद्यालय आणि रुग्णालयांमधील स्वच्छतेसाठी कायदेशीर निविदा प्रक्रिया राबविणेबाबत

**(६) * ८११८५ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण विभागाच्या वतीने वैद्यकीय आयुर्वेद, दंत आणि होमिओपॅथिक महाविद्यालय आणि रुग्णालयांमधील स्वच्छतेसाठी निविदा नियमांचे उल्लंघन करुन कंपन्यांकडून बेकायदेशीररित्या स्वारस्य अभिव्यक्ती (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) प्रसिद्ध करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाच्या वतीने स्वच्छतेच्या कामासाठी निविदा प्रक्रिया न राबवता प्रकल्प सल्लागार नेमून त्यांच्याच माध्यमातून मर्जीतील ठेकेदारांना थेट कामे देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत माहितीच्या अधिकार अन्वये कार्यकर्ते व एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन सदर प्रक्रिया तातडीने रद्द करुन कायदेशीर निविदा प्रक्रिया राबविणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन नं. २४४५/२०२४ यामध्ये दिलेल्या दि.१५/०३/२०२४ रोजीच्या निर्देशानुसार सदर निविदा रद्द करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सात शासकीय महाविद्यालयांमधील विविध कामांसाठी एकत्रित निविदा काढल्याबाबत

**(७) * ७९५०१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सात शासकीय महाविद्यालयांमधील विविध विभागांसाठी लागणारी २५६ उपकरणे व यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी २०० कोटी ५७ लाख रुपयांची एकच निविदा काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सात वेगवेगळ्या महाविद्यालयांसाठी एकत्रित निविदा मागविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी गर्व्हमेंट हॉस्पिटल सप्लायर्स असोसिएशनने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुन चौकशीची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने ६०:४० या प्रमाणात केंद्र-राज्य हिस्सा असलेली " Upgradation of Existing State Govt/Central Govt. Medical College to increase MBBS Seats in the Country" योजनेंतर्गत दहा संस्थाकरीता एकत्रित प्रशासकीय मान्यतेनुसार खरेदी करावयाच्या असल्याने एकाच प्रकारच्या यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व दरांमध्ये तफावत येऊ नये याकरीता एकच निविदा काढण्यात आलेली आहे.
(३) होय.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या सरळसेवा भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेबाबत

**(८) * ८३४७५ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या आस्थापनेवर सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये अनियमितता झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात नियुक्त करण्यात आलेले वरिष्ठ लिपिक, संगणक चालक, शिपाई, लिपिक - टंकलेखक या पदावरील उमेदवार यांना पात्रतेचे निकष डावलून नियुक्ती देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये भरती प्रक्रियेतील अहवालात देखील सदर भरती प्रक्रिया ही पूर्णत: सदोष असल्याचा अहवाल सचिव, वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये यांना सादर करुनही याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये सरळसेवा भरती प्रक्रियेतील तथा पदोन्नती प्रक्रियेत प्रमुख लिपिक तथा रोखपाल पदावरील कर्मचाऱ्याच्या चौकशी प्रकरणी वैद्यकीय अधीक्षक, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर ज. जी. समूह रुग्णालय, मुंबई यांची नियुक्ती महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत करण्यात आली होती. त्यांच्या शिफारशीनुसार दि.०८.०८.२०२३ रोजीच्या परिषदेच्या आदेशान्वये संबंधित कर्मचाऱ्यास प्रमुख लिपिक तथा रोखपाल पदावरून शिपाई पदावर पदावनत करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्व.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(९) * ८३७८२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातग्रस्त रुग्णांना तत्पर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्रमांक: रअयो-२०१६/प्र.क्र.२६०/आरोग्य-६) "स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा" योजना सुरू करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना महात्मा ज्योतिराव फुले योजनेमध्ये विलीन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३)असल्यास, सदर निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्यामुळे अपघातग्रस्त या विमा संरक्षणापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपघाग्रस्तांना तातडीने मदत व विमा संरक्षण मिळणे तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय क्र.रअयो २०१६/प्र.क्र.२६०/ आरोग्य-६, दि. १४ ऑक्टोबर, २०२० अन्वये स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

विद्यमान योजनेत पात्र अपघातग्रस्त लाभार्थ्यांना आपत्कालीन आणि पॉलीट्रामासाठी असणाऱ्या ४० पॅकेजेसच्या माध्यमातून नि: शुल्क उपचार देण्यात येत आहेत.

(४) दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयानुसार विस्तारीत स्वरुपातील एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंमलात आणणेसंदर्भातील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बदलापूर (पश्चिम) (जि.ठाणे) येथील गणेशनगर परिसरात राहणाऱ्या युवकाचा रेबिजने झालेला मृत्यू**

**(१०) * ७९४२० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (पश्चिम) (जि.ठाणे) येथील गणेशनगर परिसरात राहणारे श्री. नितीन मांडवकर यांचा श्वानदंशावरील रेबिजची लस घेतल्यावरही दिनांक १ एप्रिल,२०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदलापूर ग्रामीण रूग्णलयात त्यांना सदर लसीचे तीन डोस दिले असतानाही त्यांचा अशाप्रकारे मृत्यू होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

सदर रूग्णास दि.२२.०२.२०२४ रोजी श्वानदंश झालेला होता. सदर रूग्णास श्वानदंशावरील लसीचे ४ डोस देण्यात आले होते.सदर रूग्णाचा मुंबई येथील कस्तुरबा रूग्णालयात दि.२७.०३.२०२४ रोजी मृत्यू झालेला आहे.

(२) सदर रूग्णास बदलापूर ग्रामीण रूग्णालयात श्वानदंश लसीचे ४ डोस देण्यात आले होते. त्याच्या मृत्यूचे कारण रेबिज, एन्सेफॅलोपॅथी, उच्च रक्तदाब, मधुमेह व किडनीच्या जखमेमुळे झाल्याचे कस्तुरबा रूग्णालयाच्या अहवालावरून स्पष्ट होते.

(३) रूग्णाचा मृत्यू कस्तुरबा रूग्णालयाच्या अहवालानुसार वरील कारणास्तव झाल्यामुळे अधिक चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांनी स्व-उत्पादित केलेली औषधे विनावापर पडून असल्याबाबत

**(११) * ८०३१२ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आणि पालिका रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा असताना हाफकिन बायोफार्माने तयार केलेली रुपये १५ कोटींची औषधे शासनाने खरेदी न केल्यामुळे विनावापर पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औषधे शासनाने खरेदी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दि.०१/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील तरतुदीनुसार हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांनी स्व-उत्पादित केलेल्या औषधांपैकी त्यांच्याकडून सन २०२३-२४ मध्ये उत्पादित होणाऱ्या व त्यानुषंगाने दि.०६/०६/२०२३ रोजी दर निर्धारित केलेल्या औषधांपैकी विभागांनी (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) प्रस्तावित केलेल्या औषधांचे एकूण १७ (एकूण मूल्य रु. १६.५ कोटी) बाबींकरिता हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांना पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशन अंतर्गत सार्वजनिक जलस्त्रोतांची तपासणी केल्याबाबत

**(१२) * ८३००७ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेमार्फत जलजीवन मिशनअंतर्गत पावसाळयापूर्वी जिल्ह्यातील सार्वजनिक जलस्त्रोतांची तपासणी केली असता ८३७२ जलस्त्रोतांमधील २२०७ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे तसेच १२१५० जलस्त्रोतांच्या तपासणीत ६१९ ठिकाणी जीवाणूंचे प्रमाण अधिक असल्याने ते पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये पाणी दूषित असण्याचे सर्वाधिक प्रमाण हातपंपांमध्ये असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे मार्फत माहे एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीमध्ये रासायनिक तपासणी करीता ८७८४ पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी २२६९ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असून ६५१५ ठिकाणचे पाणी पिण्यास योग्य आहे.

तसेच जैविक तपासणीसाठी ११५६५ पाणी नमुने तपासण्यात आले, त्यापैकी ६२१ पाणी नमुन्यांमध्ये जिवाणूंचे प्रमाण अधिक असून १०९४४ ठिकाणचे पाणी पिण्यास योग्य आहेत.

जैविक दृष्टया दषित स्त्रोतांचे टीसीएल पावडरव्दारे शुध्दीकरण करून, पाणी नमुन्यांची पुन: तपासणी केली असता पाणी नमुने पिण्यास योग्य आढळून आले आहेत.

रासायनिक दृष्टया बाधित ५१५ गावांपैकी २८१ गावातील हातपंपांमधील पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत नाही.

सदर २८१ व उर्वरित २३४ असे एकूण ५१५ गावांमध्ये पाणी पिण्यास योग्य असलेले हातपंप व अस्तित्वातील नळ पाणी पुरवठा योजनांव्दारे सद्य:स्थितीत सदर गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

रासायनिक दृष्टया बाधित ५१५ गावांपैकी ४५३ गावांसाठी जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत नळ पाणी पुरवठा योजना सुरु असून त्यापैकी ८५ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या १७ योजनांची कामे प्रगती पथावर आहेत. उर्वरीत ४५ ठिकाणी पर्यायी स्त्रोतांमधून पाणी पुरवठा सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात जलस्त्रोतांमध्ये रासायनिक घटक आढळून आल्याबाबत

**(१३) * ८३४९२ अ‍ॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक भागात भूजल सर्वेक्षण विभागाने सन २०२३-२०२४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात जवळपास १७९९ पिण्याच्या पाण्याचे जलस्त्रोतांमध्ये धोकादायक रासायनिक घटक आढळून आल्याची गंभीर बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या ३३००० पिण्याच्या पाण्याच्या जलस्त्रोतांतून घेतलेल्या नमुन्यांमध्ये १०९ जलस्त्रोतांमध्ये आयर्न, ५८४ स्त्रोतामध्ये बॅक्टेरिया, ८० स्त्रोतांमध्ये क्षार व १०१६ स्त्रोतांमध्ये सर्वाधिक नाइट्रेटचे प्रमाण आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या जलस्त्रोतांत शेतातील रासायनिक खताचे बेसुमार वापरामुळे तसेच जमिनीत जाणारा चुना, धूळ तसेच मानवनिर्मित प्रदुषणामुळे व कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या रासायनिक घटकामुळे जल आणि वायू प्रदूषण वाढून जल स्त्रोत धोकादायक बनत असल्याने भविष्यातील प्रत्येक १०० रुग्णांमध्ये ६० रुग्ण विविध कर्करोगानी ग्रासलेले असतील असा अहवाल वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी शासनास माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ठिकाणच्या पेयजल स्त्रोतांमधील बॅक्टेरिया व नायट्रेटचे वाढते प्रमाण मानवनिर्मित प्रदुषणामुळे होत असून पेयजल सुधारणा करताना नव्या नळ योजना कराव्यात असे हवामान व भूजल अभ्यासक यांनी अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अशंत:खरे आहे.

नाशिक भागात भूजल सर्वेक्षण विभागाने सन २०२३-२०२४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात जवळपास ६७९ पिण्याच्या पाण्याचे जलस्त्रोतांमध्ये धोकादायक रासायनिक घटक आढळून आले आहेत.

(२) अशंत: खरे आहे.

उक्त ठिकाणच्या ३१२६९(रासायनिक- ४०९७ व जैविक-२७१७२) पिण्याच्या पाण्याच्या जलस्त्रोतांतून घेतलेल्या नमुन्यांमध्ये ४३ जलस्त्रोतांमध्ये आयर्न,९१० स्त्रोमध्ये बॅक्टेरिया (Total coliform- १७७ E-Coli-७३३), ०७ स्त्रोतांमध्ये क्षार व ४९८ स्त्रोतांमध्ये नाइट्रेटचे प्रमाण आढळून आले आहे.

(३) वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचा अहवाल सार्वजनिक आरोग्य विभाग,पाणी पुरवठा विभागामध्ये प्राप्त झाला असल्याचे दिसून येत नाही.

जलस्त्रोतात शेतातील रासायनिक खताचे बेसुमार वापरामुळे तसेच जमिनीत जाणारा चुना,धुळ तसेच मानवनिर्मित प्रदुषणामुळे व कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या रासायनिक घटकामुळे जल आणि वायु प्रदूषण वाढून जल स्त्रोत धोकादायक बनून इ. कारणांनी विविध कर्करोगांनी ग्रासलेले रुग्ण आढळून आल्याबाबतची तक्रार जिल्हा परिषद, नाशिक येथे प्राप्त झालेली नाही.

(४) हवामान व भूजल अभ्यासक यांचा अहवाल या विभागास प्राप्त झालेला नाही.

(५) रासायनिक घटकांमुळे जलस्त्रोत दूषित होऊ नयेत म्हणून तसेच झाल्यास खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात येतात:

अ) उद्योग उभारण्यासाठी व उत्पादन सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९७४ व हवा (प्रदूषण व नियंत्रण) कायदा १९८१ व घातक घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) अधिनियम १९८१ व सुधारीत नियम अंतर्गत व शर्तीसहीत संमतीपत्र प्रदान करण्यात येते.

ब) नाशिक औद्योगिक क्षेत्र तसेच इतर ठिकाणी उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करताना उद्योगाने योग्य ती वायु व जल प्रदूषण नियंत्रण संयत्रणा बसविण्याची तरतुद आहे.

क) जल तसेच वायु प्रदूषणामुळे बाधित झालेल्या रुग्णांना नाशिक जिल्हयामध्ये जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व सामान्य रुग्णालय येथे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सुविधा दिल्या जातात.

ड) भूजल सर्वेक्षण विभागाने दिलेल्या अहवालात रासायनिक घटकांचे प्रमाण हे पिण्यास योग्य असल्याच्या प्रमाणात असून फक्त करंजी खु. ता.निफाड येथे फ्लोराईडचे प्रमाण निकषापेक्षा जास्त म्हणजे १.५२ mgpl असून या ठिकाणी डी-फ्लोरिडायशेन सयंत्र बसविण्यात आले आहे. तसेच सदर गावे, वाडया वस्त्यांमध्ये गावातील उपलब्ध पर्यायी स्त्रोतांव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच रासायनिक घटकांचे प्रमाण जास्त असलेल्या हातपंपाजवळ पाणी पिण्यास अयोग्य असे बोर्ड लावण्यात आले आहेत.

इ) नाशिक जिल्ह्यातील जलस्त्रोत बाधित गावे, वाडयावस्त्यांमध्ये जिल्हा परिषद तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांची कामे घेण्यात आली असून सदरहू कामे प्रगती पथावर आहेत, ज्यामध्ये Electroclorination unit अथवा Water treatment plant चा समावेश आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथे होत असलेल्या गैरकारभारास आळा घालणेबाबत

**(१४) * ८३२७१ श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा स्त्री रुग्णालय बुलढाणा येथे डॉक्टरांच्या हजेरी पटावर प्रत्यक्षात गैरहजर असलेल्या डॉक्टरांची उपस्थिती दर्शविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिक्षक यांच्या मर्जीतील एका डॉक्टरचे नाव डयुटी लिस्टमध्ये समाविष्ट नसताना त्यांची उपस्थिती दर्शवून वेतन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच रुग्णालयात कंत्राटी कामगार पुरविणाऱ्या साई कंपनीच्या कंत्राटदाराला कंत्राटी कामगारांचे वेतन देण्यात आले तथापि कंत्राटदाराने रुग्णालयातील कंत्राटी कामगारांना मात्र वेतन दिले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथील जे वैद्यकीय अधिकारी गैरहजर आहेत त्यांचे हजेरी पटावर त्यांचे नावासमोर रेषा मारण्यात आलेल्या आहे. तसेच सदर कालावधीचे त्यांचे वेतनसुध्दा काढण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा येथील ज्या वैद्यकीय अधिका-यांच्या हजेरी पटावर नियमित स्वाक्षऱ्या आहेत व डयुटी लिस्टमध्ये नाव आहे व त्यांनी प्रत्यक्षात डयुटी केलेली आहे याची खात्री करुनच वेतन काढण्यात येते.

(३) हे खरे नाही.

जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, बुलढाणा अंतर्गत ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय बुलढाणा या आरोग्य संस्था मध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा रुग्णालय बुलढाणामार्फत साई मल्टीसर्विसेस कंपनीस आर्थिक वर्ष सन २०२३-२०२४ मध्ये एकुण १.१७ कोटी रुपयाचे देयक अदा करण्यात आले असून कंत्राटदारानी कामगारांना वेतन दिले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील 'अमुदान केमिकल्स प्रायव्हेट-लिमिटेड' या कारखान्यात झालेला भीषण स्फोट

**(१५) * ८४३४७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील 'अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड' या रसायन कंपनीमध्ये दिनांक २३ मे, २०२४ रोजी झालेल्या स्फोटात १६ कामगारांचा मृत्यू व ६५ कामगार जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटात परिसरातील कंपन्यांमधील कामगार देखील जखमी झाले असून दोन-तीन कि.मी.च्या परिसरातील घरांचे व दुकानांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीने बाष्पक (बॉयलर) वापरण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी भारतीय बॉयलर अधिनियम, १९५० नुसार संबंधित विभागाची कोणतीही परवानगी न घेता अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदर बॉयलर अनधिकृतरित्या सुरु केला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डोंबिवलीतील औद्योगिक कंपन्यांमधून होणारे वाढते प्रदूषण, वारंवार घडणारे स्फोट, बंद कंपन्यांमधून सुरु असणारे बेकायदा उद्योग तसेच प्रदुषणकारी व धोकादायक अशा १५६ कंपन्या स्थलांतरीत करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मृत व जखमी कामगारांना आर्थिक मदत देणे तसेच यातील संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह या परिसरातील धोकादायक कंपन्यांच्या स्थलांतरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, डोंबिवली या कारखान्यात दिनांक २३ मे, २०२४ रोजी रिॲक्टरमध्ये तापमान व दाब वाढल्यामुळे रिॲक्टरचा स्फोट झाला. या अपघातात १३ कामगारांचा मृत्यू झाला व ६७ व्यक्ती जखमी झाल्या आहेत.
(२) हे खरे आहे.

सदर स्फोटामध्ये अमुदान केमिकल्स प्रायव्हेट-लिमिटेड, कारखान्याच्या शेजारी सप्तवर्ण कलर्स प्रायव्हेट लिमिटेड, डोंबिवली या कारखान्यातील एक कामगार व कॉसमॉस इंजिनिअरिंग, या आस्थापनेतील दोन कामगार मृत पावले आहेत. सदर स्फोटात परिसरातील एकूण १८ कंपन्यांमधील ४० कामगार जखमी झाले आहेत व आसपासच्या परीसरातील घरांचे व औद्योगिक आस्थापनांचे नुकसान झाले आहे.
(३) सदर कंपनीत कोणतेही नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत बाष्पके वापरण्यात येत नव्हते असे निदर्शनास आले आहे.
(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी पाहणी केली जाते. तसेच त्रुटी आढळल्यास जल कायदा, १९७४ व हवा कायदा,१९८१ त्याचप्रमाणे घातक घनकचरा अधिनियम, २०१८ नुसार कारवाई केली जाते.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात मागील तीन वर्षांमध्ये स्फोटांच्या घटना घडलेल्या नाहीत. बंद कंपन्यांबाबत तसेच धोकादायक कंपन्या स्थलांतरीत करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही सुरु आहे.
(५) १३ मृत कामगारांपैकी २ मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून प्रत्येकी रु. ५ लाख अदा करण्यात आले आहेत. उर्वरीत ११ मृत कामगारांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपये याप्रमाणे एकूण ५५ लाख रुपये जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

तसेच एकूण १३ मृत कामगारांपैकी १२ कामगारांच्या वारसांना राज्य कामगार विमा योजना कार्यालयामार्फत नुकसानभरपाई मिळणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

उर्वरीत एका मृत कामगाराच्या वारसास नुकसानभरपाई मिळणेबाबत मा.नुकसानभरपाई आयुक्त, यांना पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून कारखाने अधिनियम, १९४८ च्या विविध तरतूदींच्या भंगाकरीता अमुदान केमिकल्स प्रा. लि या कारखान्याचे

भोगवटादार यांचे विरुध्द ०९ खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

तसेच अमुदान केमिकल्स प्रा.लि, डोंबिवली या कारखान्याचे सन २०२५ पर्यंत नुतनीकरण केलेला परवाना रद्द करण्यात आला आहे.

या प्रकरणी मानपाडा पोलिस स्टेशन येथे दि.२४.०५.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली होती.तद्नंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण यांनी दि. १४/०६/२०२४ रोजी त्यांना जामीन मंजूर केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अमुदान केमिकल्स प्रा.लि., या कारखान्याला दिनांक २३/०५/२०२४ रोजी उद्योग बंद बाबतचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

सदर अपघातानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात येणाऱ्या संमतीपत्राचे उल्लंघन करणा-या उद्योगांवर उद्योग बंदचे आदेश पारित केले आहेत.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक कारखाने स्थलांतरीत करण्याकरीता दि. २८/०५/२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून डोंबिवली औद्योगिक वसाहतीतील रहिवासी भागाशेजारील सर्व अतिधोकादायक व रासायनिक कारखान्यांचे स्थलांतर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जि.धुळे) येथे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१६) * ७९५६८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण):** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सिटीस्कॅन व एम.आर.आय. ची सुविधा नसल्याने रुग्णांना अतिरिक्त आर्थिक भार सोसावा लागत असून ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डायलिसिस व लॅप्रोस्कोपी करण्यासाठी लागणाऱ्या मशिनही बंद अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर महाविद्यालयात सिटीस्कॅन व एम.आर.आय. ची सुविधा उपलब्ध करणेसह बंद अवस्थेत असलेली वैद्यकीय उपकरणे कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बंद असलेली वैद्यकीय उपकरणे दुरुस्तीबाबत (एएमसी व सीएमसी) व्दारे यंत्रे कार्यान्वित करण्यात येतात. तसेच याकरीता येणारा खर्च हा ७२-दुरुस्ती या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालय व बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयातील गैरकारभाराबाबत

**(१७) * ८०३९७ श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रेडिओलॉजी व अॅनेस्थेशिया विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थिनींचे रॅगिंग करण्यात आल्याची घटना दिनांक १३ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनींनी याबाबतची तक्रार अधिष्ठातांकडे लेखी स्वरुपात केली असता याबाबत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल अद्याप सादर न होण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, ससून रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी दिनांक ३१ डिसेंबर,२०२३ रोजी केलेल्या मद्य पार्टीप्रकरणी नेत्रविकार विभागाच्या प्रमुख डॉ. संजीवनी आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पाच सदस्यीय चौकशी समितीचा अहवालही अद्याप शासनास सादर न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, ससून रुग्णालय आणि बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वारंवार घडणारे अनुचित प्रकार, अंतर्गत राजकारण याबाबत शासनास अनेक तक्रारी प्राप्त होवूनही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागील एक वर्षात या रुग्णालयात ४ वेळा वैद्यकीय अधिक्षकांची बदली करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे खरे नाही.

बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथील क्ष-किरणशास्त्र (रेडिओलॉजी) आणि भुलशास्त्र (अॅनेस्थेशिया) या विभागात पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षात शिकत असलेल्या महिला कनिष्ठ निवासी-१ डॉक्टर यांनी विभागातील इतर कनिष्ठ निवासी-१ डॉक्टरांकडून मानसिक त्रास देत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारी या रॅगिंग स्वरूपाच्या नसून विभागातील कनिष्ठ निवासी यांच्यातील आपापसातील गैरसंवादातून झालेल्या गैरसमजुतीमुळे प्रकरण उद्भवले असल्याचे संस्थास्तरावरील चौकशी समितीने (अँटी रॅगिंग समिती व पीजी तक्रार निवारण समिती) नमूद केलेले आहे.

(३) व (४) बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे दि.३१/१२/२०२३ रोजी रात्री नववर्षाच्या पूर्वसंध्येला निवासी वसतिगृहात झालेली पार्टी व तोडफोडीबाबत संस्था स्तरावर चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर चौकशी समितीचा अहवाल विचारात घेऊन दि.३१/१२/२०२३ रोजी झालेल्या पार्टीत सहभागी उमेदवारांवर सहा महिन्यांकरिता वसतिगृह निंलबन या स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांकडून त्यांच्या शैक्षणिक कालावधीत किंवा नियुक्तीच्या कालावधीत भविष्यात असा अनुचीत प्रकार घडणार नाही असे हमीपत्र लिहून घेण्यात आले आहे.

(५) हे खरे आहे.

(६) दि.३१/१२/२०२३ रोजी झालेल्या नववर्षाच्या पार्टीमध्ये सहभागी उमेदवारांवर सहा महिन्यांकरिता वसतिगृह निलंबन या स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

## अंधेरी (पूर्व) मरोळ येथील कामगार रुग्णालयाच्या बांधकामाची झालेली दुरवस्था

**(१८) * ८१४२२ श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व):** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) मरोळ येथील कामगार रुग्णालय आगीच्या दुर्घटनेनंतर दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी पुन्हा सुरू झाले असून या रुग्णालयाच्या बांधकामाची अवघ्या आठ महिन्यांत दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील चारही मजल्यांवरील फॉल सिलिंग कोसळलेले असून अनेक ठिकाणी भिंतीचे प्लास्टर पडलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे तेथील रुग्णांचे आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयाची दुरुस्ती करणे, रुग्णालय पूर्ण वेळ कार्यान्वित ठेवणेबाबत तसेच संबंधित दोषी कंत्राटदार यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

अंधेरी येथील कामगार रूग्णालय हे केंद्र शासनामार्फत चालविण्यात येत असून आगीच्या दुर्घटनेनंतर सदर रूग्णालयाच्या इमारतीची दुरूस्ती व नुतनीकरण करण्यात येऊन दि.१४.०८.२०२३ पासून सदर रूग्णालयातील बाह्यरूग्ण विभाग पुन्हा सुरू करण्यात आले आहे. तथापि, माहे मार्च २०२४ मध्ये सदर रूग्णालयातील तळमजल्याच्या फॉल सिलींगचे एका कोपऱ्यातील प्लास्टर पडल्यानंतर त्याची दुरूस्ती करण्यात आली असून भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी सर्व मजल्यावरील फॉल सिलींगची सखोल पाहणी करण्यात आल्यानंतर तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींची दुरूस्ती करण्यात आली असल्याचे क्षेत्रिय कार्यालय, राकावि महामंडळ मुंबई यांनी दिनांक २७.०६.२०२४ रोजी च्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राकावि महामंडळाच्या क्षेत्रिय कार्यालयाने सर्व मजल्यावरील फॉल सिलींगची सखोल पाहणी/ तपासणी करुन त्यामध्ये आढळलेल्या त्रुटींची दुरूस्ती केलेली असल्याचे कळविले आहे.

(४) याबाबतची कार्यवाही केंद्र शासनाच्या राकावि महामंडळाच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'गट-क' संवर्गातील पदे भरण्याकरिता झालेल्या निवड प्रक्रियेची चौकशी करण्याबाबत

**(१९) * ७९९२५ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'गट-क' संवर्गातील विविध रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता लेखी परीक्षा घेण्यात आल्या असून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक २५ फेब्रुवारी,२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता उपसंचालक, आरोग्य सेवा (शिक्षण व संपर्क विभाग), विश्रांतवाडी, पुणे येथे उपस्थित राहण्याकरिता कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपस्थित झालेल्या संबंधित उमेदवारांनी आंतरवासियता (Internship) पूर्ण केली असताना आंतरवासियता प्रमाणपत्र (Internship Certificate) उपलब्ध नसल्याचे कारण सांगून त्यांना अपात्र करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आंतरवासियता प्रमाणपत्र (Internship Certificate) आवश्यक असल्याचे जाहिरातीमध्ये कुठेही नमूद नसताना देखील उमेदवारांना अपात्र करण्यात आल्याने या भरती प्रक्रियेसंदर्भात अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून पात्र उमेदवारांना न्याय मिळवून देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर शासनाने कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
शैक्षणिक अर्हतेशी संबंधित पदांवरील उमेदवारांनी जाहिरातीच्या अखेरच्या दिनांकास आंतरवासियता पूर्ण करणे बंधनकारक आहे. ज्या उमेदवारांनी जाहिरातीच्या अखेरच्या दिनांकास आंतरवासियता पूर्ण केलेली नाही त्यांना समुपदेशनावेळी अपात्र ठरविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना लाभ मिळणेबाबत

**(२०) * ८०२०७ श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र शासनाच्या पंतप्रधान जनआरोग्य योजनेतंर्गत साडेचार लाख नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड वितरित केले असून कार्डावर पाच लाख रुपयांच्या खर्चापर्यंतचे उपचार मोफत होणार असल्याची हमी शासनाच्या वतीने देण्यात आली असतानाही या योजनेंतर्गत राज्यात अनेक रुग्णांमध्ये उपचार करण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या संकेतस्थळावर राज्यातील सुमारे २०० रुग्णालयांची यादी देण्यात आली असतानाही राज्यातील अनेक रुग्णालयांनी या योजनेचे लॉगीन केलेले नसल्यामुळे रुग्णांना याचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात नागरिकांनी अनेक तक्रारी करुनही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतंर्गत उपचार घेतलेल्या परराज्यातील रुग्णांचे कोटयवधी रुपये सन २०१९ पासून केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याने यासंदर्भात राज्यातील रुग्णालयाने केंद्र शासनासह संबंधित समन्वयकांकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोटयवधी रुपयांची देयके प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, या योजनेंतर्गत अनेक जिल्ह्यांमध्ये कार्ड वाटपाचे काम अद्यापही अपूर्ण असल्यामुळे रुग्णांना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सद्य:स्थितीमध्ये २.७८ कोटी लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यात आले आहेत.

अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास रुग्णाचे नाव / आधार क्रमांक इत्यादी तपशिलावरून रुग्ण आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभार्थी आहे किंवा कसे ? याबाबत शहानिशा केली जाते. लाभार्थी असल्याचे आढळून आल्यास राज्य आरोग्य हमी सोसायटी मार्फत चौकशी करून संबंधित रुग्णालयावर योग्य ती कारवाई केली जाते.

(२) खरे नाही.

यापूर्वी योजने अंतर्गत ९९७ रुग्णालये (१९६ शासकिय व ८०१ खाजगी) अंगीकृत करण्यात आली आहेत. या सर्व रुग्णालयांची यादी योजनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दि.२८.०७.२०२३ च्या शासन निर्णयान्वये योजनेचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार दि.०१.०७.२०२४ पासून वाढीव उपचारांची व अंगीकृत वाढीव रुग्णालयांची माहिती देखील योजनेच्या संकेतस्थळावर अद्यायावत करण्यात येत आहे. योजने अंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमधून सर्व पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.

(३) खरे नाही.

अशी कोणतीही तक्रार राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयास अथवा योजनेची अंमलबजावणी करणा-या तृतीय पक्ष प्रशासक कंपनीकडे प्राप्त झालेली नाही.

(४) अंशत: खरे आहे.

राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत सन २०१९ ते २९ जून २०२४ पर्यंत परराज्यातील रुग्णांनी ६६,६०८ इतक्या शस्त्रकिया / उपचारांचा मोफत लाभ घेतला असून त्यापोटी एकूण ९,९२२ दावे प्रलंबित आहेत. सदर दाव्यांची रक्कम रु.२७,५८,७९,०६८/- एवढी आहे. संबंधित राज्यांना देय रक्कम अदा करण्याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(५) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीमध्ये योजनेच्या एकूण लाभार्थ्यांपैकी २.७८ कोटी लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आलेले आहे. त्यापैकी माहे मे, २०२४ पर्यंत ५८,५६,६२९ इतक्या कार्डांचे प्रत्यक्ष वितरण करण्यात आले आहे. तर उर्वरित कार्डांचे वितरण आशा कर्मचा-यांमार्फत करण्यात येत आहे.

तातडीच्या वेळी, योजने अंतर्गत अंगिकृत रुग्णालयांमध्ये आरोग्य मित्र यांच्या मार्फतही आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जातो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील तीन रस्त्यांची कामे पूर्ण करणेबाबत**

**(२१) * ७९८६६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हारे (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील तीन रस्त्यांची कामे कंत्राटदाराने अपूर्णावस्थेत ठेवली असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीमध्ये नेरळ बोपेले रस्त्यापासून हजारे नगर रस्ता रूपये २३ लाख, सिद्धी विनायक अपार्टमेंट ते कृष्णा पार्क या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी रूपये १८ लाख व बोपेले नेरळ कळंब रस्ता ते अनश रेसिडेंन्सी रस्ता खडीकरण व डांबरीकरणासाठी रूपये १७ लाख ९५ हजार इतका निधी मंजूर झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांचे कार्यारंभ आदेश रायगड जिल्हा परिषदेने माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देऊनही सदर कामे ठेकेदाराने अपूर्णावस्थेत ठेवल्याने कामांची मुदत संपली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तात्काळ कामे पूर्ण करणेबाबत तसेच संबंधीत कंत्राटदारांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

तीन पैकी एक काम पूर्ण झाले असून दोन कामांचे कारपेट व सिलकोट काम बाकी आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

तीन कामांपैकी एक काम पूर्ण केले आहे व दोन कामांचे कारपेट व सिलकोट काम बाकी आहे.

(४) याप्रकरणी चौकशी केली असून २ कामांबाबत संबधित ठेकेदाराला कामे त्वरीत पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद, रायगडकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

तसेच मुदतीत कामे पूर्ण केली नसल्यामुळे जिल्हा परिषद, रायगडकडून संबंधित ठेकेदारास नियमानुसार देयक अदा करताना दंड आकारण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील लाभार्थी महिलांना थकीत अनुदानाची रक्कम अदा करणेबाबत

**(२२) * ८१५१२ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माता व बालमृत्यूचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतंर्गत पात्र लाभार्थी महिलेला पहिल्या अपत्त्यासाठी रुपये ५,००० इतकी रक्कम दोन हप्त्यांमध्ये तर दुसरे अपत्य मुलगी झाल्यास मुलीच्या जन्मानंतर एकाच टप्प्यात रुपये ६,००० चा लाभ देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील अठरा हजार महिलांना तसेच अमरावती जिल्ह्यातील पाच हजार महिलांना अद्याप या योजनेचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतंर्गत थकीत असलेल्या अनुदानाची रक्कम तातडीने मिळणेसंदर्भात तसेच प्रसुती झाल्याबरोबरच सदर लाभार्थी मातेच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी शासनस्तरावर सक्षम संगणकीय प्रणाली स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ (व जून-२०२४ अखेर) मध्ये पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील एकूण ७४४९ लाभार्थ्यांपैकी १४८१ लाभार्थ्यांना लाभ दिला असून अमरावती जिल्ह्यातील ११७४२ पात्र लाभार्थ्यांपैकी ७८१७ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे व उर्वरित लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही केंद्र शासनातर्फे सुरु आहे.

(४) सदर योजनेचे पोर्टल, कार्यक्रमाचे संनियंत्रण व परिचालनाचे सर्व अधिकार केंद्र शासनाच्या महिला व बाल कल्याण मंत्रालयाकडे आहेत. सदर योजनेचे जुने पोर्टल (PMMVY CAS) माहे मार्च, २०२३ अखेर त्यावरील माहितीसह केंद्र शासनाकडून बंद करण्यात आले असून एप्रिल, २०२३ पासून पीएमएमव्हीवाय योजनेचे नवीन पोर्टल २.० अद्यावत करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेतील १० निकषानुसार पात्र लाभार्थ्यांची नोंदणी केली जाते. जुन्या (PMMVY CAS) पोर्टल मधील लाभापासून प्रलंबित लाभार्थ्यांपैकी ग्रामीण भागातील लाभार्थी माहिती अद्ययावत करण्यात येत असून त्यामध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याने त्याबाबत संगणकीय प्रणाली स्थापन करण्याबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील त्र्यंबक प्लास्टिक कारखान्याला लागलेल्या आगीबाबत

**(२३) * ८३४५८ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण):** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमधील त्र्यंबक प्लास्टिक कारखान्याला लागलेल्या आगीत ३ कामगारांचा मृत्यू व १७ कामगार जखमी झाले असून कारखान्याचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी देखील माळेगाव औद्योगिक वसाहतीमधील एका ऑरगॅनिक कारखान्यात लागलेल्या आगीत कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यांकडून अग्निसुरक्षा विषयक कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन करण्यात आले असून संबंधित यंत्रणेकडून नियमित तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व जखमींना आर्थिक मदत देणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी त्र्यंबक प्लास्टीक इंडस्ट्रिज, मुसळगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक या कारखान्यात आग लागली होती.तथापि सदर आगीच्या घटनेत कोणीही जखमी अथवा मृत झालेले नाही.

या आगीमुळे सदर कारखान्याच्या मालमत्तेचे अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

यापुर्वी दिनांक ०२/०२/२०२४ रोजी आदिमा ऑरगॉनिक्स इंडिया प्रा. लि., मुसळगाव, ता. सिन्नर, जि.नाशिक या कारखान्यात आगीची घटना घडली होती. या आगीत कारखान्याचे अंदाजे रु. अठरा कोटींचे

नुकसान झाले असल्याचे  व्यवस्थापनाने कळविले आहे. सदर आगीच्या घटनेत कोणीही जखमी वा मृत झालेले नाहीत.

तसेच दिनांक २९/१२/२०२३ रोजी माळेगाव औद्योगिक वसाहतीमधील हिंदुस्थान नॅशनल ग्लास लिमिटेड,माळेगाव या कारखान्यात आगीची घटना घडली होती. सदर घटनेत कारखान्याचे रु. अंदाजे ३६८ कोटी चे नुकसान झाले असल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे. सदर आगीच्या घटनेत कोणीही जखमी वा मृत झालेले नाहीत.

(३) त्र्यंबक प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, मुसळगांव या कारखान्याने नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसून आग प्रतिबंधक उपाययोजना केलेली नव्हती. तथापि, सदर कारखान्याने दि.०२/०७/२०२४ रोजी तात्पुरती आग संरक्षक मान्यता घेतली आहे,असे आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांनी कळविले आहे.

(४) सदर तिन्ही आगीच्या घटनांची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली असून, त्र्यंबक प्लॉस्टिक इंडस्ट्रिज या कारखान्यात लागलेल्या आगीच्या घटनेच्या चौकशीअंती महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चा भंग आढळून आल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात दिनांक २६/०६/२०२४ रोजी एक खटला दाखल केला आहे.

आदिमा ऑरगॅनिक्स इंडिया प्रा. लि., या कारखान्यात लागलेल्या आगीच्या घटनेच्या चौकशीअंती महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चा भंग आढळून आल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात दिनांक ३०/०४/२०२४ रोजी खटला दाखल केला आहे.

हिंदुस्थान नॅशनल ग्लास लिमिटेड, माळेगांव या कारखान्यात लागलेल्या आगीच्या घटनेच्या चौकशीअंती महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चा भंग आढळून आल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात दिनांक २८/०३/२०२४ रोजी खटला दाखल केला आहे.

सदर तिन्ही आगीच्या घटनांमध्ये कोणीही कामगार मृत वा जखमी झालेले नसल्यामुळे आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये सुरु असलेले बेकायदेशीर उद्योग बंद करणेबाबत

**(२४) * ८३३४१ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील तळवडे-भोसरी औद्योगिक वसाहतीमध्ये मोठया प्रमाणात बेकायदेशीर व धोकादायक उद्योग सुरु असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळवडे येथे फायर कॅन्डल बनविणाऱ्या कारखान्यात दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या स्फोटात १६ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू औद्योगिक वसाहतीमध्ये एका उद्योगाच्या परवान्यावर अनेक बेकायदेशीर, धोकादायक व विनापरवाना व्यवसाय सुरु असल्याचेही दैनिक पुढारीने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरप्रकारांकडे संबंधित विभाग व पोलिस प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व जखमी कामगारांना आर्थिक मदत देणेबाबत तसेच बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या औद्योगिक परवान्यांची तपासणी करुन संबंधित दोषी व जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील तळवडे-भोसरी औद्योगिक वसाहतीमध्ये मोठया प्रमाणात बेकायदेशीर व धोकादायक उद्योग सुरु असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, मे. शिवराज एंटरप्रायझेस, तळवडे येथे दि.०८/१२/२०२३ रोजी लागलेल्या आगीमुळे हा बेकायदेशीर व धोकादायक उद्योग सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

मौजे तळवडे, पुणे येथील शिवराज एंटरप्रायझेस येथे चमकणाऱ्या मेणबत्ती बनवित असताना दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी आग लागली होती. सदर घटनेत १४ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(३) दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये याबाबतची बातमी छापून आली होती.

(४) व (५) मे.शिवराज एंटरप्रायझेस येथे लागलेल्या आग प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागातर्फे चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशी दरम्यान कारखाने अधिनियम, १९४८ चे आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या भंगाबाबत दिनांक १३.१२.२०२३ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात ४ फौजदारी खटले भोगवटादाराविरुध्द दाखल केले आहेत.

याप्रकरणी देहू रोड पोलिस स्टेशन येथे दि.०८/१२/२०२३ रोजी गुन्हा नोंद केला आहे. आस्थापनेतील मृत व जखमी कामगारांना नुकसान भरपाई मिळणेबाबत नुकसान भरपाई आयुक्त, पुणे यांना दिनांक ०९.१२.२०२३ रोजी कळविण्यात आले आहे. कामगार न्यायालय, पुणे यांचेकडून नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्यासाठी हस्तांतरण आस्थापनेस नोटीस बजावली आहे.

सदर प्रकरणांमध्ये मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी रु.५ लाख, मा. प्रधानमंत्री राष्ट्रीय सहाय्यता निधीमधून प्रत्येकी रु.२ लाख व एका जखमी कामगारास रु.५० हजार अशा प्रकारे एकूण रु.९८.५ लाख इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत विनापरवाना कारखान्यांची विशेष तपासणी मोहीम अंतर्गत एकूण जवळपास ६० कारखान्यांना भेटी दिल्या आहेत व कारखाने अधिनियमांतर्गत येणा-या कारखान्यावर कारवाई करण्यात येत आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.